ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३१ पुणें, बुधवार ५ मे, १९६५ अंक ९

ICO-I HIN

# नहीं—
# यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है : १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नवल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५३३७२ कारखाना : ४०८१२

### वधू, वर पाहिजे

वृत्तपत्रांत जाहिराती देऊन विवाह जमविण्याची पद्धत भारताप्रमाणें इतर देशांतहि आढळते. पश्चिम जर्मनीमध्यें दुसऱ्या महायुद्धानंतर एकूण जेवढे विवाह झाले त्यांपैकी प्रत्येक दहांत एक विवाह वृत्तपत्रांतील जाहिराती किंवा विवाह जुळविणाऱ्या संस्था आणि दलाल ह्यांच्या मार्फत घडून आलेला होता. वर आणि वधू ह्यांच्या तपशीलाची छाननी करून त्याप्रमाणें अद्ययावत् पत्रकें तयार करण्यासाठी प. जर्मनींत एलेक्ट्रॉनिक साहित्यांचा वापर केला जात आहे. वृत्तपत्रांतील वधू-वरांचीं वर्णनें वाचणाऱ्या वाचकाला, एवढ्या लायक वधूवरांना जाहिरातींचा अवलंब कां करावा लागतो, ह्याचें कोडें पडल्याविना राहात नाहीं.

### बिड्यांची निर्गत

१९६३ सालीं भारतानें १,२९,२५९ किलोग्रॅम बिड्या निर्गत केल्या. अफगाणिस्तान, बेहरिन, ब्रह्मदेश, सिलोन, कुवेत, मलेशिया, नेपाळ आणि पाकिस्तान हे आयात करणारे प्रमुख देश आहेत. अमेरिकेंत हिंदी बिड्यांचा हळूहळू प्रसार होत आहे. त्यांचें पॅकिंग सुधारलें तर ह्या प्रसारास आणखी चालना मिळेल. सिगरेट ओढल्यामुळें कॅन्सर होण्याचा संभव असतो. पण त्याचें मुख्य कारण त्यांतील तंबाखूपेक्षा कागदाचें वेष्टन हेंच असतें. सिगार, पाइप, बिडी, हुक्का, इत्यादींपासून कॅन्सरचा धोका त्यामुळें कमी आहे.

### प्रिन्स चार्लस वयाच्या १८ व्या वर्षी लॉर्डांच्या सभेंत

वयाच्या २१ व्या ऐवजीं १८ व्या वाढदिवशीं, नोव्हेंबर १९६६ मध्यें, प्रिन्स चार्लस लॉर्डांच्या सभेंतील आपली जागा घेण्याचा संभव आहे. ह्या बाबतींत राणी घटना तज्ज्ञांचा सल्ला घेत आहे.

### जगांतील मोटारींचें उत्पादन

१९६४ सालीं जगांतील सर्व देशांत मिळून २ कोटी, २० लाखांवर प्रवासी मोटारगाड्या व मालवाहू गाड्या उत्पादन करण्यांत आल्या. चीनमधील उत्पादनाचा आंकडा मिळत नसल्यानें तो वगळलेला आहे. ब्रिटननें २३ लाख, ३५ हजार मोटारींचें उत्पादन केलें. मोटारींच्या उत्पादनांत ब्रिटनचा ३ रा क्रमांक लागला. पहिला क्रमांक अमेरिकेचा व दुसरा पश्चिम जर्मनीचा लागला. ह्या देशांतून अनुक्रमें ९३ लाखांवर व २९ लाखांवर गाड्या तयार करण्यांत आल्या. जपाननें मोटारींच्या उत्पादनांत ४१ टक्के वाढ करून फ्रान्सचें ४ थें स्थान पटकावलें. १९६३ सालापेक्षा जगांतील मोटारींचें उत्पादन ११ टक्क्यांनीं वाढलें.

### हृदयविकारावर अळशीच्या तेलाचा उपयोग

हृदयविकाराचे झटके थांबविण्यासाठी अळशीच्या तेलाचा उपयोग करण्याचा अजब प्रयोग अमेरिकेंत मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत आहे. ह्या विकार असणाऱ्या रोग्यानें आपल्या आहारांत रोज एक चमचा अळशीचें तेल घेतलें तर त्याला येणारे झटके बंद होतात असें आढळून आलें आहे. अळशीच्या तेलांत एक प्रकारचें आम्लद्रव्य असतें. त्यामुळें रक्तवाहिन्या आंतून जोड होण्याची प्रक्रिया बंद होते. आणि रक्त गोठण्याची क्रियाहि थंडावते. अमेरिकेंतील १० ते १५ हजार नॉर्वेजिअन रहिवाशांनीं अळशीच्या तेलाचा आहारांत उपयोग करण्याच्या प्रयोगांत सामील होण्यास खुषीनें संमति दिलेली आहे. हृदयविकाराच्या रोगावर सोयाबीनच्या तेलाचाहि असाच उपयोग करतां येणें शक्य आहे.


: सहकारांतून समृद्धि :

## कृष्णा सहकारी साखर कारखाना लिमिटेड,

रेठरे बुद्रुक, पो. शिवनगर [सातारा]

**सन १९६३–६४ चीं वैशिष्टें**

उत्पादकांना उसाचा भरपूर मोबदला,
सभासदांना डिव्हिडंड,
कामगारांना तीन महिन्यांचा बोनस,
उद्दिष्टापेक्षा जादा गळीत,
साखरेचा उतारा १३·३४.

**सन १९६४–६५ च्या गळीत हंगामाची नेत्रदीपक वाटचाल**

| | |
|---|---|
| उत्पादनाचा संकल्प | २,६७,७५० पोती |
| प्रत्यक्ष उत्पादन | २,७८,००० पोती (ता. २४–४–६५ पर्यंत) |
| संकल्पित ऊंस गळीत | २,१०,००० टन |
| प्रत्यक्ष गळीत | २,११,७७० टन (ता. २४–४–६५ पर्यंत) |
| साखरेचा उतारा | १३·२० (ता. २४–४–६५ पर्यंत) |

**याशिवाय सर्वांगीण उन्नतीकरितां**

११,००० एकरांसाठी पांच भव्य जलसिंचन योजना,
आशिया खंडांतील मोठी कोंबडी पालन संस्था,
वराह पालन व प्रक्रिया संस्था,
ऊंस वाहतुकीसाठी रबरी बैलगाड्यांचा कारखाना,
सिमेंट पाईप कारखाना.

त्याचप्रमाणें इतर सहकारी साखर कारखान्यांच्या सहकारानें

११ कोटी रुपये भांडवलाचा कागद कारखाना,
सहकारी अर्कशाळा (डिस्टिलरी)

**दि. पा. मोहिते** — व्हाईस चेअरमन

**ज. कृ. भोसले** — चेअरमन

# अर्थ

बुधवार, ५ मे, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रशिआकडून अधिक पेट्रोलजन्य पदार्थ

भारताला लागणाऱ्या खनिज तेलाचा व तज्जन्य पदार्थांचा पुरवठा करण्यांत पश्चिम युरोपांतील तेलकंपन्या अग्रेसर आहेत. परंतु ह्या कंपन्यांकडून तेलाच्या गरजा भागविण्याच्या कामीं दुर्मिळ चलनांत किंमत चुकती करण्याचा अवघड प्रश्न निर्माण होतो. परदेशीय चलनाची टंचाई वाढत चालल्यामुळें हा प्रश्न अधिकच बिकट होत आहे. म्हणून भारत सरकारनें आपली तेलाची गरज वेगळया मार्गानें भागविण्याचा निर्णय घेतला आहे. रशिआ भारताला पेट्रोल आणि तज्जन्य पदार्थ रुपयाच्या चलनाच्या मोबदल्यांत देण्यास तयार आहे. पेट्रोलचे पदार्थ पुरविणाऱ्या सध्यांच्या पाश्चिमात्य कंपन्यांनीं आपल्या मालकीच्या तेलाऐवजीं रशिआचें तेल आयात करावें आणि तें सांठवून त्याच्या वितरण्याची व्यवस्था करावी असे प्रयत्न करण्यांत आले होते. परंतु त यशस्वी झाले नाहींत. कारण, रशिआकडून होणारी तेलाची विक्री ही राजकीय स्वरूपाची असल्याच्या सबबीवर पाश्चिमात्य कंपन्यांनीं ही व्यवस्था अमान्य केली. तेलाच्या सांठ्याचा व वितरणाचा प्रश्न व्यापक स्वरूपाचा असल्यानें भारत सरकारच्या मालकीच्या इंडिअन ऑइल कॉर्पोरेशनला हें काम एकदम अंगावर घेतां येणें अवघड आहे. बरोनी येथें उभारण्यांत आलेला तेलशुद्धीचा कारखाना अद्याप नीट चालू झालेला नाहीं. त्याचप्रमाणें कोयाली येथील कारखान्याची उभारणी लांबणीवर पडली आहे. अशा परिस्थितींत रुपयांच्या चलनांत देण्यांत येणाऱ्या पेट्रोलचा विचार करणें आवश्यक ठरत आहे. तसें न केल्यास १९६५–६६ सालांत पेट्रोलवर खर्च होणाऱ्या परदेशीय चलनाचा आंकडा अंदाजापेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे.

## उत्तर प्रदेशांतील रेशमाच्या किड्यांची पैदास

रेशमाचे किडे आणि त्यांचीं अंडीं ह्यांची पैदास करण्याचा सहकारी तत्त्वावरील धंदा उत्तर प्रदेशांत १० वर्षांपूर्वीं स्थापन करण्यांत आला. डेहराडूनजवळ प्रेमनगर ह्या ठिकाणीं रेशमाच्या पैदाशीचें हे केंद्र उभारण्यांत आले आहे. आतां हा धंदा जोमाला लागला असून प्रेमनगरहून काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि मध्यप्रदेश ह्या राज्यांना रेशमाच्या किड्यांचीं अंडीं पाठविण्यांत येतात. डेहराडून भागांतील शेतकऱ्यांना फावल्या वेळांत करतां येण्यासारखा नवाच धंदा उपलब्ध झाला आहे. उत्तर प्रदेशांत हा धंदा करणाऱ्या ३६ सहकारी संस्था आहेत. रेशमाच्या किड्यांच्या अंड्याप्रमाणें अंड्याबाहेर पडलेले अल्पवयाचे किडेहि राज्यसरकार गरजूंना पुरवत असतें. ह्याबाबतींत उत्तर प्रदेश सरकारनें झपाट्यानें प्रगति केली आहे. तेथील किड्यांच्या पैदाशीचें तंत्र अगदीं अद्ययावत् आहे. सध्यां देशांत किड्यांच्या पैदाशीचें इतकें आधुनिक पद्धतीचें दुसरें केंद्र नाहीं. किड्यांची जोपासना नीट व्हावी म्हणून त्यांच्या निवासस्थानांतील उष्णतेचें व हवेंतील आर्द्रतेचें नियंत्रण करण्याची व्यवस्था मुद्दाम करण्यांत आली आहे. रेशमाच्या किड्यांच्या सुधारलेल्या जाती निर्माण करण्यासाठी उंच ठिकाणीं एक उपकेंद्रहि स्थापन करण्यांत येणार आहे. रेशमाच्या किड्यांचें जीवन हा एक चमत्कार आहे. त्याचें आयुर्मान अवघें ४५ दिवसांचें असतें. पण, इतक्या अल्पकालांत तो आपल्या वजनाच्या ३० हजार पट वजनाचीं तुतीचीं पानें फस्त करतो. मग तो स्वतःच्या शरीराभोंवतीं एक कोष तयार करतो आणि झोपी जातो. एका कोषापासून सुमारें ६०० मीटर लांबीचा रेशमाचा धागा निघूं शकतो. उत्तर प्रदेशांतील हिमालयाच्या परिसरांत ह्या धंद्याला विशेष अनुकूल वातावरण आहे.

## समुद्रकिनाऱ्यावरील जमिनीची धूप

शेतीस अगर बागायतीस उपयुक्त असणाऱ्या जमिनीची सालोसाल होत जाणारी धूप हा मोठा बिकट प्रश्न आहे. ही धूप फक्त पावसापाण्यानें होते असें नाहीं. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील नारळीपोफळीच्या बागासुद्धां सागरनिर्मित धोक्याच्या तडाख्यांत सांपडतात. कोंकणांतील समुद्राकिनारीं असणाऱ्या जमिनी सागराच्या तोंडांत जात असल्याच्या बातम्या मधून मधून येत असतात. सागराच्या घडकामुळें होणाऱ्या धुपेचें प्रमाण केवढें मोठें असूं शकतें तें मलबारमधील एका घटनेवरून दिसून येतें. मलबारच्या समुद्रकिनाऱ्यावरील एका गांवच्या हद्दींतील २ फर्लांग लांबीची व ६० ते ७० फूट रुंदीची जमीन अलीकडेच सागराच्या भक्ष्यस्थानीं पडली आहे. जमिनीवर होणाऱ्या ह्या सागरी आक्रमणाचें स्वरूप केरळ राज्यांत बरेंच उग्र आहे. केरळच्या समुद्रकिनाऱ्याची लांबी ५८० किलोमीटर आहे आणि ह्या सर्वच किनाऱ्यावर सागराचें वाढतें आक्रमण होत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस किनाऱ्याची धूप थांबविण्यासाठी राज्य सरकारचे ५ कोटी रुपये खर्च होतील. इतकी मोठी रक्कम खर्च करूनहि अवघ्या ६५ किलोमीटर लांबीच्या किनाऱ्याचें संरक्षण होईल. जमिनीचें रक्षण करण्यासाठी वापरण्यांत येणाऱ्या तंत्रांत बदल करण्याची जरुरी ह्यासंबंधीं अमेरिकन तज्ज्ञांनीं केलेल्या अहवालावरून दिसून येते. पण, हें नवीन तंत्र खर्चिक आहे. १·६ किलोमीटर किनाऱ्याचे सागराच्या लाटांच्या माऱ्यापासून रक्षण करण्यासाठी २० ते ३५ लाख रुपये खर्च लागेल असा अमेरिकन तज्ज्ञांचा अंदाज आहे. ४ थ्या पंचवार्षिक योजनेंत २०० किलोमीटर लांबीच्या किनाऱ्यांच्या रक्षणाचें काम हातीं घेण्यांत येणार आहे.

## चीनविरुद्ध विमानदळ कां वापरलें नाहीं?

१९६२ च्या ऑक्टोबरला नोव्हेंबर महिन्यांत भारताच्या उत्तर सरहद्दीवर चीननें आक्रमण केलें. ह्या आक्रमणाला भारताच्या लष्करानें फक्त जमिनीवरील सैनिकांच्या साहाय्यानें तोंड दिलें. प्रत्यक्ष लढाईत विमानें वापरलीं नाहींत. अमेरिकेचे भारतामधील माजी वकील मि. जॉन गॅलब्रेथ ह्यांनीं ह्यासंबंधीं 'न्यूयॉर्क टाइम्स' मध्यें पत्र लिहून नवी माहिती दिली आहे. भारतानें विमानांचा वापर केल्यास युद्धाला आणखीच उग्र स्वरूप येईल; म्हणून त्यांचा वापर न करण्याबद्दल आपणच पंतप्रधान नेहरू ह्यांचें मन वळविलें, असें त्यांनीं वरील पत्रांत म्हटलें आहे. ह्या युद्धांत विमानदल वापरावें कीं नाहीं हा त्या वेळीं मोठा वादाचा मुद्दा झाला होता. विमानदल न वापरल्यामुळें चीनच्या लष्कराच्या ताकदीबद्दल भ्रम उत्पन्न झाला असें कांहीं लोक म्हणतात.

### ग्रामीण भागांतील मनुष्यबळाचा उपयोग

हिंदमधील ग्रामीण भागांतील लोकांना शेतीचा हंगाम संपल्यावर काम मिळत नाहीं. त्यामुळें ह्या भागांतील मनुष्यबळ वाया जातें. मध्यवर्ती सरकारचे समाजविकास मंत्री श्री. एस. के. डे ह्यांनीं ह्या प्रश्नासंबंधीं बोलतांना अशी माहिती दिली कीं ४ थ्या पंचवार्षिक योजनेंतील पहिल्या तीन वर्षांत ग्रामीण भागांतील मनुष्यबळाचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्यांत येईल. देशांतील २ हजार समाजविकास गटांचा ह्या कामीं उपयोग करून घेण्यांत येईल. त्यामुळें सुमारें २५ लाख अधिक लोकांना रोजगार उपलब्ध होईल. ग्रामीण भागांतील सुदृढ लोकांना वर्षांतून निदान १०० दिवस तरी रोजगार देतां येणें नव्या धोरणामुळें शक्य होईल. परिणामी पंचायतींना नियमित उत्पन्न मिळण्याचें एक नवें साधनहि उपलब्ध होईल. ४ थ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरच्या दोन वर्षांत ग्रामीण भागांतील ५० लाख लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचें उद्दिष्ट साध्य होईल. ह्या कार्यक्रमाच्या काळांत पंचायती राज्याची संघटना अधिक बळकट करण्याकडे विशेष लक्ष देण्यांत येईल. प्रत्येक पंचायतीला प्रशिक्षित नोकर मिळण्याचीहि व्यवस्था होईल. ग्रामीण भागांतील बेकार आणि निमबेकार ह्यांचा उपयोग करून घेण्यास लागणारीं साधनेंहि पुरविण्यांत येतील. सध्या शहरी विभागांच्या विकासाकडे अधिक लक्ष पुरविलें जातें. शहरी विभागांच्याबरोबरच ग्रामीण भागाच्या विकासाकडे लक्ष पुरवून दोन्ही विभागांत समतोल राखण्याचे प्रयत्न करतां येतील. त्यासाठीं ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत एक उपकार्यक्रम तयार करण्यांत येत आहे.

### कुष्ठ रोग्यांच्या वसाहतीला विघ्न

आग्रा येथें ताजमहालच्या नजीक जपानच्या साहाय्यानें कुष्ठ रोग्यांवर उपचार करण्यासाठीं एक स्वतंत्र वसाहत स्थापण्यांत येणार आहे. वसाहतीसाठीं लागणाऱ्या सोयी उपलब्ध करून देण्याच्या बाबतींत आग्रा कॉर्पोरेशन आणि राज्यसरकार ह्यांच्यांत मतभेद उत्पन्न झाल्यामुळें वसाहतीच्या उभारणीबाबत अडचणी उभ्या राहिल्या आहेत. वसाहतीला पाणीपुरवठा करण्यासाठी लागणारे नळ आणि वीजपुरवठ्याची सोय ह्यांच्यासाठी येणारा खर्च कॉर्पोरेशन व राज्यसरकार ह्यांनीं निमानिम सोसावा असें प्रथम ठरलें होतें. परंतु नंतर राज्यसरकारनें वीजपुरवठ्यासाठी लागणारा निम्मा खर्च देण्यास विरोध केला. वीजपुरवठ्यासाठी ११ लाख, २१ हजार रुपये खर्च येणार आहे. अखेर ३·२ लाख रुपयांची सरकारी मदत घेऊन बाकीची रक्कम कॉर्पोरेशननें कर्जाऊ उभारावी असें ठरलें.

### पश्चिम जर्मनीची भारताला मदत

पश्चिम जर्मनीनें १९५० सालापासून अविकसित राष्ट्रांना मदत म्हणून तीन हजार कोटी रुपयांचीं कर्जें अगर देणग्या दिल्या आहेत. ह्या मदतीपैकीं सर्वांत अधिक म्हणजे २७ टक्के मदत भारताला देण्यांत आली आहे. चालू पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या चार वर्षांत भारताला अमेरिकेकडून व जागतिक बँकेकडून अधिक मदत झाली. त्यानंतर पश्चिम जर्मनीचाच क्रमांक लागतो. भारताच्या औद्योगिक विकासांत जर्मनीच्या मदतीचें स्थान मोठें आहे. रूरकेला येथील पोलाद कारखाना हें त्या मदतीचें मोठें प्रतीक असलें, तरी त्याशिवाय आणखी ३०० तांत्रिक व आर्थिक मदतीचे करार जर्मनीनें गेल्या आठ वर्षांत भारताशीं केले आहेत. अलीकडेच जर्मन उद्योगपतींचे एक मंडळ भारतांत येऊन गेलें. त्यांना भांडवल गुंतवणुकीचें वातावरण अनुकूल वाटलें.


सरदारगृह

मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्टयें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५ ,, |
| ठेवी | ... | रु. | ३१८ ,, |
| खेळतें भांडवल | ... | रु. | ४५३ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.


स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा. ४, ६ व ८ वैली फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

— न्यु विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

## Result of the Examination for the Higher Diploma in Co-operation for Session 1964-65

**Very Good**

Gankar M. V., Yadav A. K., Wani B. D., Chikodi A. V., Narvekar D. V., Doiphode K. A., Kshirsagar M. M., Dumbre S. B., Aphale G. S., Ghule J. K.

**Good**

Abhyankar R. D., Venkatraman G., Patil A. B., Nikam A. V., Jagtap G. B., Mhatre P. V., Ali S. M., Gote S. L., Girase J. V., Pohare R. A., Pandav E. R., Wandkar D. V., Dhumale B. R., Okate P. T., Waldhurkar Y. D., Godale T. V., Patil L. P., Patale D. M., Patil M. D., Dabri B. J., Saoji V. B., Angadi S. M., Deshmukh S. B., Bhale D. B., Gaikwad B. G., Chilka T. D., Gadgil B. V., Marwadi S. G., Khisti P. B., Nanote S. G., Patil V. M., Adgaonkar M. N., Patil N. R., Patil A. K., Mahajan B. A., Katore B. B., Mirajkar M. D. Joshi D. S.

**Fair**

Khan H. D., Moray B. D., Ranade B. N., Bhosale B. K. (ex-trainee)

Shri. M. V. Gankar from Amarawati District Central Co-operative Bank Ltd., has been awarded "Principal P. M. Chengappa" prize of Rs. 5/-0 as the best-trainee for the 1964-65 Session.

The following trainees (regular and ex) have secured in aggregate marks of 40% or above 40% and entitled to get exemption are in the subjects shown against their names.

| | Subjects in which he gets exemption. |
|---|---|
| Joshi M. B. | Cooperation, Cooperative Law & other lawas, Cooperative practice, Cooperative Accounts & community Development etc. |
| Kolte D. A. ... | " " " |
| Kukade B. K. ... | " " " |
| Powar S. M. ... | " " " |
| Pathak S. B. ... | Cooperation, & Cooperative Practice etc. |
| Patil J. B. ... ... | Cooperative Practice, Coop. Accounts and Community Development. |
| Thakre V. N.... | Co-operation, Cooperative Practice, Cooperative Accounts & Community Development. |
| **EX-TRAINEES** | |
| Dharmadhikari B. H. | Cooperation & Cooperative Practice, |
| Puranik A. V. ... | Cooperation, Cooperative Practice and Cooperative Accounts. |
| Tamhne H. N. | Cooperative Practice etc., |

S. R. Jog
Principal
Cooperative Training Centre,
Poona-16.

## परदेशी हुंडणावळींत न बसणारा चेक

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

अबदुस शकूर हा पूर्वी सौदी अरेबियामधील अरेबियन अमेरिकन ऑईल कंपनींत धा-हान येथें नोकरीला होता. सप्टेंबर, १९५९ मध्यें त्याची नोकरी संपली आणि त्याला दोन चेक देण्यांत आले. त्यांपैकी एक चेक त्यानें सौदी अरेबियांत वटविला. दुसरा चेक कंपनीनें हिंदी रुपयांत काढला होता; त्याची तारीख २९ सप्टेंबर, १९५९ अशी होती. तो चेक "नेदरलंड ट्रेडिंग सोसायटी, अल् खोबार" वर "नेदरलंड ट्रेडिंग सोसायटी, मुंबई" मार्फत काढलेला होता. "पे टु दि ऑर्डर ऑफ अबदुस शकूर रु. १६,५०४.२१" असा चेकवर मजकूर होता. शकूरनें हा चेक मुंबईला आणला आणि तो बादशहा आणि कंपनीला देऊन त्याचे पैसे घेतले. बादशहा आणि कंपनीनें तो चेक मटकल प्रोव्हिजन स्टोर्स अलुलोबरकडे धाडला. वाटेंत तो चेक काढून घेण्यांत येऊन एन्फोर्समेंट डिरेक्टोरेटकडे पाठविण्यांत आला. फॉरिन एक्सचेंज रेग्युलेशन कायद्याच्या २३ ड कलमाखाली शकूरवर नोटीस बजावण्यांत आली. प्रस्तुत चेक परदेशी हुंडणावळ होती, आणि त्याला तो कायदा लागू होता, हें मला माहीत नव्हतें, असें शकूरनें सांगितलें. आपण त्या चेकचे पैसे कायद्याच्या अज्ञानामुळें बादशहा आणि कंपनीकडून घेतले, असेंहि त्यांनीं म्हटलें.

डायरेक्टोरेट ऑफ एन्फोर्समेंटनें शकूरला कायद्याच्या कलमाचा भंग केल्याबद्दल दोषी ठरवून त्याला २,००० रु. दंड केला. पुढें हें प्रकरण मुंबई हायकोर्टांत गेलें. हायकोर्टानें हा दंड रद्द केला. कायद्याच्या कलमाचे अर्थामध्यें प्रस्तुत चेक बसतो का, हा प्रश्न हायकोर्टापुढें होता. हिंदी रुपयांत काढलेला आणि हिंदी किंवा परदेशी चलनांत वटू शकणारा चेक हा परदेशी हुंडणावळींत बसत नाहीं, असा हायकोर्टाचा अभिप्राय पडला.

---

## पूना-इलेक्ट्रिक कंपनीनें सुप्रीम कोर्टांत अपील जिंकलें

"योग्य मर्यादेबाहेर वसूल करण्यांत आलेली रक्कम प्राप्तिकरास प्राप्त होत नाहीं, कारण ती रक्कम इंडियन इलेक्ट्रिसिटी कायद्याप्रमाणें वीज-ग्राहकाला परत द्यावी लागते." असा निवाडा पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीच्या दोन अपिलांचे बाबतींत सुप्रीम कोर्टानें केला आहे. १९५३-५४ आणि १९५४-५५ ह्या दोन वर्षांसाठी कंपनीनें १, १९, २८७ रुपयांच्या उत्पन्नाला करमाफी मागितली होती. ठराविक मर्यादेपेक्षा नफा जास्त झाला तर रिबेटच्या स्वरूपांत तो नफा ग्राहकांना परत वाटला पाहिजे, अशी कंपनीच्या परवान्यांतील अट आहे. कंपनीनें आपल्या ताळेबंदांत ही रक्कम 'कंझ्यूमर्स बेनिफिट्स रिझर्व्ह फंड" खातीं दाखविलेली होती. रेव्हिन्यू ट्रायब्यूनलनें ही रक्कम प्राप्ति म्हणून धरली होती. त्यावर कंपनीनें हायकोर्टाकडे अपील केलें होतें, तें हायकोर्टानें फेटाळलें होतें. "कंपनीनें निर्माण केलेला रिझर्व्ह फंड कायद्याप्रमाणें वीज-ग्राहकास देण्यास कंपनी बांधलेली आहे. तेव्हां त्यास प्राप्ति असें म्हणतां येणार नाहीं." असें न्यायमूर्ति सुब्बाराव म्हणाले.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**गुन्हेगाराची शांत अखेर**—अमेरिकेंत दारूबंदी जारी असलेल्या काळांतील कुप्रसिद्ध गुन्हेगार मि. मॅडन हा आपल्या वयाच्या ७३व्या वर्षी शांतपणें निधन पावला. न्यूयॉर्क आणि न्यू जर्सी ह्या दोन अमेरिकन राज्यांत त्यानें २० वर्षेपर्यंत दहशतीनें सत्ता गाजविली. अमेरिकन गुप्त पोलिसांच्या दप्तरांत त्याला सार्वजनिक शत्रु नं. २ असें नांव दिलेलें होतें. १९१० ते १९३४ ह्या काळांत त्याच्यावर सहा खून केल्याचे आरोप करण्यांत आले होते. गेलीं ३० वर्षे मात्र तो एका श्रीमंत माणसाचें जीवन शांतपणें जगत होता.

**विजगापट्टम् गोदीचा विकास**—विजगापट्टम् येथील बोटी बांधण्याच्या गोदीचा विस्तार व आधुनिकीकरण करण्याच्या कामांत युगोस्लाव्हिआची मदत होण्याचा बराच संभव आहे. ह्या बाबतींत भारत आणि युगोस्लाव्हिआ ह्यांच्या दरम्यान वाटाघाटी चालू आहेत. बोटी बांधण्याच्या शास्त्रांत युगोस्लाव्हिआला चांगला अनुभव आहे. तेथील तंत्रज्ञहि ह्या कामांत तरबेज आहेत.

**रशिअन परराष्ट्रमंत्र्यासाठी अमेरिकन मोटार**—रशिआनें आपले परराष्ट्रमंत्री मि. ग्रोमिको ह्यांच्या नांवानें एक विलासी मोटारगाडी खरेदी केली आहे. गाडीसाठी १७ हजार डॉलर्स म्हणजे ८१,००० रुपये किंमत द्यावी लागली. गाडींत दूरदर्शयंत्र बसविण्यांत आलेलें आहे. तिची लांबी २० फूट असून ८ माणसें तींत आरामांत बसूं शकतील. अशा प्रकारच्या फक्त ७० गाड्या अमेरिकेनें ह्या वर्षी बनविल्या आहेत. गाडींतील हवामान सुखद राखण्याची व्यवस्थाहि आहेच.

**लष्करासाठी लागणारें अन्न**—म्हैसूर येथें संरक्षणखात्यानें चालविलेली अन्नसंशोधन संस्था लष्कराला लागणाऱ्या अन्नपदार्थांविषयीं उपयुक्त संशोधन करीत आहे. विशेषतः भारताच्या उत्तर सरहद्दीवर ठाण मांडलेल्या हिंदी लष्कराला वजनांत हलके, कसदार आणि शिजवण्यास सोपे अशा प्रकारचे अन्नपदार्थ लागतात; ते पुरविण्याच्या कामीं संस्था चांगलें काम करीत आहे.

**सहकारी कागद कारखाना**—महाराष्ट्रांतील चार सहकारी कारखान्यांनीं सहकार्य करून सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा एक कागदाचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्यासाठी १५ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. त्याची उत्पादनक्षमता दरसाल ३६ हजार टनांची असेल. कच्चा माल म्हणून उसाचीं चिपाडें वापरण्यांत येणार आहेत. चिपाडांची गुणवत्ता अमेरिकन तंत्रज्ञांनीं तपासलेली आहे.

**रेल्वेच्या कोळशाच्या चोऱ्या**—रेल्वेच्या वॅगन्स, एंजिनें आणि एंजिनघरें ह्यांमधून होणाऱ्या कोळशाच्या चोऱ्यांमुळें रेल्वेखातें बेचैन झालें आहे. ह्या चोऱ्यांची व्याप्ति शोधून काढण्यासाठी एक तज्ज्ञ समिति नेमण्यांत आली होती. समितीला असें आढळून आलें कीं, रेल्वेला पुरविण्यांत येणाऱ्या कोळशापैकीं १ टक्का कोळसा चोरीला जातो. दक्षिण रेल्वेवर चोऱ्यांचें प्रमाण सर्वांत अधिक म्हणजे ३·२८ टक्के आहे.

**परदेशांत उद्योगधंदे**—हिंदी उद्योगपतींचें सहकार्य घेऊन इराण, सीलोन आणि नेपाळ ह्या देशांतून सात उद्योगधंदे काढण्याचें भारत-सरकारनें ठरविलें आहे. सिलोन व इराणमध्यें आणखी तीन संयुक्त मालकीच्या औद्योगिक संघटना काढण्याचा विचारहि सरकार करीत आहे. परदेशांतील उद्योगपतींच्या सहकार्यानें आग्नेय आशिआ व आफ्रिका ह्या भागांत उद्योगधंदे काढण्याचें भारत सरकारचें धोरण आहे.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
|---|---|
| ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई | महाल : नागपूर. |
| टेलिफोन नं. २५५४७४–७५, | तारेचा पत्ता : |
| २५६२१४ २५४७८१ | फार्मर बँक |

: बृहन्मुंबईतील शाखा :

( १ ) मायखळा ( २ ) गोरेगांव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्लें ( ७ ) सांताक्रूझ ( ८ ) मुलुंड ( ९ ) चेंबूर ( १० ) माहीम ( ११ ) शीव ( १२ ) माटुंगा ( १३ ) अंधेरी.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ५,००,४३,००० |
| गंगाजळी व फंड | ... | १,४४,७४,००० |
| ठेवी | ... | ३०,९०,२५,००० |
| खेळतें भांडवल | ... | ७९,७७,३७,००० |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

| | |
|---|---|
| वा. सु. श्रीश्रीमाळ | वि. म. जोगळेकर, |
| मॅनेजर. | जनरल मॅनेजर. |



# स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. १ कोटी, १ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,२०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,१०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस

ग्लोव्ह्ज—इरेझर्स—ऑईल सील्स

व

स्वरूप केबल्स

# स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.

स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.

( टेलिफोन नं. : ५५२०१ )

## राष्ट्रीय उत्पन्नांत ४·५% वाढ

१९६२–६३ च्या मानानें १९६३–६४ मध्यें, १९४८–४९ च्या किमतीच्या हिशेबानें, राष्ट्रीय उत्पन्न ४·५% नें वाढलें; त्यापूर्वीच्या वर्षी १·९% वाढ झाली होती. १९६३–६४ मध्यें झालेल्या वाढींपैकी १·९% वाढ शेतीच्या क्षेत्रांत आणि ६·५% वाढ अन्य क्षेत्रांत झाली.

१९६३–६४ मधील राष्ट्रीय उत्पन्नाचा आंकडा १३,९१० कोटी रु. होता; १९६२–६३ मध्यें तो १३,३१० कोटी रु. होता; आणि १९६१–६२ मध्यें १२,७३० कोटी रु. होता. म्हणजे दर माणशीं वार्षिक उत्पन्न १९४८–४९ च्या किमतीच्या हिशेबानें, अनुक्रमें २९९·८ रु., २९३·४ रु. आणि २९३·२ रु. पडलें.

चालू किमतीच्या हिशेबानें, १९६३–६४ मध्यें राष्ट्रीय उत्पन्न १७,२०० कोटी रु. झालें. १९६२–६३ मध्यें तें १५,४०० कोटी रु. होतें. म्हणजे, दर माणशीं वार्षिक उत्पन्न अनुक्रमें ३७०·७ रु. आणि ३३९·४ रु. पडलें.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत राष्ट्रीय उत्पादन ९·३% वाढलें आणि दरमाणशीं उत्पन्न, स्थिर किमतीच्या हिशेबानें ३·३% वाढलें, असें दिसून येईल–

| वर्ष | राष्ट्रीय उत्पादन (१०० कोटी रु.) चालू किमतीनें | राष्ट्रीय उत्पादन (१०० कोटी रु.) १९४८-४९ च्या किमतीनें | दर माणशीं उत्पादन (रु.) चालू किमतीनें | दर माणशीं उत्पादन (रु.) १९४८-४९ च्या किमतीनें |
|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | ९५·३ | ८८·५ | २६६·५ | २४७·५ |
| १९५५-५६ | ९९·८ | १०४·८ | २५५·० | २६७·८ |
| १९६०-६१ | १४१·४ | १२७·३ | ३२५·७ | २९२·२ |
| १९६१-६२ | १४८·० | १३०·६ | ३३३·६ | २९४·३ |
| १९६२-६३ | १५४·० | १३३·० | ३३९·४ | २९३·४ |
| १९६३-६४ | १७२·० | १३९·० | ३७०·७ | २९९·८ |

## ९१३ कोटी रु. भांडवलाच्या ५२ सरकारी कंपन्यांना मिळून ५५ लक्ष रु. तोटा

मध्यवर्ती सरकारच्या मालकीच्या ५२ कंपन्यांना मिळून १९६३-६४ मध्यें ५५·१७ लक्ष रु. तोटा झाला; १९६२–६३ मध्यें ४६ कंपन्यांना मिळून १२·३८ लक्ष रु. तोटा झाला होता. १९६३–६४ मध्यें, ५२ कंपन्यांपैकी ३४ कंपन्यांना मिळून १९·७६ कोटी रु. नफा झाला, आणि त्यांनीं त्यांच्या वसूल भांडवलावर वाटलेल्या डिव्हिडंडचा दर ७% पडला. १४ कंपन्यांनीं मिळून २०·१३ कोटी रु. तोटा दाखविला; त्यापैकी १८·९९ कोटी रु. तोट्याला पांच कंपन्या जबाबदार आहेत. ५२ कंपन्यांचें वसूल भांडवल ९१३ कोटी रु. आहे.

## बनावट ड्राफ्ट वटवून फसवणूक

दि स्टँडर्ड बँक ऑफ साउथ आफ्रिकाचे बनावट ड्राफ्ट} तयार करून दोन व्यापारी आणि रिझर्व्ह बँक ह्यांस फसविल्याबद्दल सहा दक्षिण आफ्रिकी हिंदी लोकांना बृहन्मुंबईच्या सेशन्स कोर्टानें दोन ते सात वर्षे मुदतीची कारावासाची शिक्षा दिली. एकूण २,३६,००० रुपयांच्या बाबतींत ही फसवणूक झाली होती.

## नॅशनल प्रोजेक्ट्स कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन

सार्वजनिक मालकीच्या विभागांतील ह्या औद्योगिक संघटनेला १९६३–६४ सालीं ३८·५९ लाख रुपये नफा झाला. मोठमोठ्या प्रकल्पांतील सिव्हिल एंजिनिअरिंगचीं कामें ही संघटना करते. कॉर्पोरेशन स्थापन होऊन ७ वर्षे झालीं आहेत. इतक्या वर्षांत संघटनेनें मिळविलेल्या वार्षिक नफ्याचा हा उच्चांक आहे. संघटनेचें भांडवल १२५ लाख रुपयांचें असून तें मध्यवर्ती व राज्य सरकारांनीं भरणा केलेलें आहे. ह्या भांडवलावर ६ टक्के नफा जाहीर करण्यांत आला आहे. १९६३–६४ सालीं कॉर्पोरेशननें ५१० लाख रुपये किमतीचें बांधकाम केलें. त्यामागील सालीं २४० लाख रुपये किमतीचें काम करण्यांत आलें होतें.

## पहिलीं कर्जें नवीन कर्जांना खाऊन टाकीत आहेत

अविकसित देशांचा विकास करण्यासाठी अमेरिकेंतील आंतरराष्ट्रीय विकास संघटना कर्जें देते. पण ह्या कर्जांची रक्कम इतकी फुगत चालली आहे कीं नवीन कर्जें जुन्या कर्जांच्या फेडीसाठी वापरण्याची पाळी आली आहे. पुढील वर्षअखेरीस भारताचें परदेशीय कर्ज ६०० कोटी डॉलर्सच्या घरांत जाईल. भारताला आपलीं कर्जें फेडण्यासाठी पुढील पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत परदेशीय हुंडणावळीच्या प्राप्तींपैकी एक–चतुर्थांश हिस्सा द्यावा लागेल. संघटनेच्या अहवालांत असें म्हटलें आहे कीं, अविकसित देशांना देण्यांत आलेल्या कर्जांत ते देश आतां कंठापर्यंत बुडले आहेत. त्यांच्या डोक्यावर आजवर दिलेल्या मदतीच्या कर्जांचा बोजा एवढा मोठा आहे, कीं नव्या कर्जांमुळें होणाऱ्या फायद्यांत मोठी घट होत चालली आहे.

हार्डबोर्ड, टीक-प्लाय आणि प्लायवुडची खरेदी करण्याचें पुणें शहरांतील अगत्याचें ठिकाण

फोन नंबर :
निवास : ५४८२९
शहरांतील दुकान : २४,९९४
कॅंपमधील दुकान : २६,२३७

दलाल आणि कंपनी
सोन्यामारुती चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

कॅंप शाखा :
२९६ महात्मागांधी रोड, पुणें १


## जपानमध्यें जाहिरातींवर प्रचंड खर्च

गेल्या कांहीं वर्षांत जपानच्या अर्थव्यवस्थेंत कल्पनातींत बदल झाला आहे. चारपांच वर्षांपूर्वी जपानमध्यें माल विकणाऱ्यांचें अधिराज्य होतें; तर आतां माल घेणाऱ्यांची सत्ता आहे. ही वस्तुस्थिति जाहिरातींवर खर्च करण्यांत येणाऱ्या प्रचंड रकमेवरून उघड दिसून येते. गेल्या पांच वर्षांत निरनिराळया माध्यमांतून करण्यांत येणाऱ्या जाहिरातींवरील खर्च दुप्पट वाढला आहे. १९६४ सालीं मालाच्या विक्रीसाठी देण्यांत येणाऱ्या जाहिरातींवर १०० कोटी डॉलर्स खर्च करण्यांत आले. ह्या खर्चांत वृत्तपत्रें, मासिकें, रेडिओ, दूरदर्शन, इत्यादि सर्व माध्यमांवर करण्यांत आलेला खर्च आहे. जाहिरातींवरील खर्चाचा १९५९ सालामधील आंकडा ४·४ कोटी डॉलर्स होता.

## चहाच्या सहकारी कारखान्यांत नवी भर

निलगिरी जिल्ह्यांत चहाचे उत्पादन सहकारी तत्त्वावर करणारे दोन कारखाने आहेत. मद्रास सरकारनें तयार केलेल्या योजनेप्रमाणें आतां आणखी ६ सहकारी कारखाने काढण्यांत येणार आहेत. चहाचे छोट्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या मळेवाल्यांना मदत म्हणून त्यांची स्थापना करण्यांत येणार आहे. ही योजना चहा बोर्डानें आणि भारत सरकारनें मंजूर केली आहे. ह्या छोट्या मळेवाल्यांना कमी किमतींत खतें आणि कीड निवारण करणारी औषधें पुरविण्यांत येतील. त्याशिवाय कर्जरूपानेंहि त्यांना मदत देण्यांत येईल. गेल्या वर्षी भारतांत सुमारें ८·२४ कोटी पौंड चहाचें उत्पादन झालें आणि तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ठरविण्यांत आलेल्या उत्पादनाचें उद्दिष्ट एक वर्ष आधींच गाठण्यांत आलें.


# महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागांत विजेमुळे समृद्धीचा मार्ग खुला



विजेमुळें जीवनांत अनेक सुखसोयी उपलब्ध होतात. आतापर्यन्त फक्त शहरांतूनच असणाऱ्या अशा कित्येक सुखसोयी आज महाराष्ट्रांतील अनेक गांवांना मिळाल्या आहेत. विजेमुळें शेतमालाच्या उत्पादनांतहि वाढ करता येते, व ल्हान उद्योगांचा विकास करता येतो. तेव्हां ग्रामीण विभागांत वीज गेल्याने समतोल अशी ग्रामीण अर्थरचना निर्माण करण्यास मदत होते.

महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागास वीजपुरवठा करण्याच्या कामानी झालेली प्रगती उत्साहवर्धक आहे. पहिल्या महाराष्ट्र दिनी ५३२ गांवांना वीजपुरवठा करण्यात आला होता, तर ३१ डिसेंबर १९६४ रोजी या गांवांची संख्या २,६८७ इतकी वाढली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस आणखी ५८५ गांवांना वीजपुरवठा करण्यात यावयाचा आहे आणि अशा प्रकारे महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनांत क्रांती घडवून आणण्याचे काम चालू राहणार आहे.

प्रसिद्धी संचालक
महाराष्ट्र शासन
मुंबई

# विविध माहिती

**सुगंधी वनस्पतींचें संशोधन**—सुगंधी वनस्पतीविषयक संशोधन करण्यासाठी तिरुपती येथें एक संशोधन केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. सुगंधी वनस्पतीबरोबरच औषधी वनस्पति, तेल देणाऱ्या वनस्पति, कॉफी, चहा आणि रबराचीं झाडें ह्याविषयींहि संशोधन करण्यांत येईल. ह्या वनस्पति संशोधनासाठी उपलब्ध व्हाव्या म्हणून एक स्वतंत्र बागायती शेतवाडीच तयार करण्यांत येणार आहे. प्रयोगसिद्ध नव्या वनस्पतींची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यासाठीं जमविलेली माहिती प्रसिद्ध करण्यांत येईल.

**झेकोस्लोव्हाकिआला बुटांची निर्यात**—झेकोस्लोव्हाकिआचें आयात-निर्यात खातें आणि भारत ह्यांच्या दरम्यान झालेल्या करारास अनुसरून झेकोस्लोव्हाकिआ भारताकडून १·४ कोटी रुपयांचा माल विकत घेणार आहे. ह्या मालांत मुख्यतः कापड आणि बूट ह्यांचा समावेश आहे. ह्या मालाच्या बदला झेकोस्लोव्हाकिआ भारताला कापडगिरण्यांची यंत्रसामग्री देणार आहे.

**ठेवी घेण्याच्या बँकांविरहित संस्था**—लोकांकडून ठेवी घेऊन कर्जे देण्याचा धंदा करणाऱ्या बँकविरहित संघटनांवर निर्बंध घालण्याचा विचार मद्रास सरकार करीत आहे. बिगर-पतपेढी संघटनांच्या बँकिंगच्या धंद्यावरहि नियंत्रणें घालण्याचा विचार चालू आहे. ह्या उपायांमुळे बँकांच्या धंद्यावर होणारा परिणाम टळेल आणि बँकांव्यतिरिक्त व्यवहारांत येणाऱ्या पैशालाहि आळा बसेल.

**औषधांसाठी लागणारा कच्चा माल**—औषधांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या आयात करण्यांत येणाऱ्या कच्च्या मालाच्या विक्रीवर व वितरणावर नियंत्रणें घालण्याचा विचार भारत सरकारचें आरोग्यखातें करीत आहे. खुल्या बाजारांत मालाच्या किंमती चढ्या असल्यामुळें सरकारला हा उपाय योजावा लागत आहे. शिवाय, औषध कारखानदार ज्या औषधांच्या विक्रीवर अधिक नफा सुटतो त्याला लागणाऱ्या कच्च्या मालाचीच अधिक आयात करतात असें आढळून आलें आहे.

**लोकर कापण्याची यांत्रिक पद्धत**—मेंढ्यांची लोकर यांत्रिक पद्धतीनें कापण्याच्या कामीं राजस्थान भारतांत पहिलें ठरलें आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेतकी विभागातर्फे ह्या पद्धतीचें शिक्षण देणारें केंद्र उघडण्यांत आलें आहे. लोकर कापण्याची यंत्रसामग्री विजेवर चालणारी आहे. आतांपर्यंत ११० लोकांना शिकवून तयार करण्यांत आलें असून येत्या दोन वर्षांत आणखी २५० कामगार तयार करण्यांत येतील. राजस्थानांत ८० लाख लोकर देणाऱ्या मेंढ्या असून भारतामधील लोकरीच्या एकूण उत्पादनापैकी ४५ टक्के लोकरीचें उत्पादन राजस्थानांत करण्यांत येतें.

**सर्पविषावरील औषधें टोंचण्यांत सावधानता**—जगांत सर्पांच्या निरनिराळ्या २,५०० जाती आहेत; पण त्यांपैकी २०० जातीच विषारी आहेत. साप चावल्यावर भीतीनें आणि मानसिक धक्क्यानेंच बहुतेक मृत्यु घडून येतात असें म्हणतात. साप विषारी नसेल तर त्यावर उतारा म्हणून टोंचण्यांत आलेल्या औषधाचे वाईट परिणाम घडून येण्याचा संभव असतो. म्हणून लिव्हरपूर येथील संशोधन केंद्रानें असा इशारा दिला आहे कीं, सर्पदंशाचीं लक्षणें दिसूं लागल्यावरच त्यावरील उताऱ्याचें औषध टोंचण्यांत यावें.

**रशिआला भारताचीं संत्रीं पाहिजेत**—रशिआ भारताकडून मोठ्या प्रमाणावर संत्र्यांची आयात करण्यास तयार आहे. संत्र्यांच्या किंमतीबद्दल सध्यां वाटाघाटी चालू आहेत. ग्रीस, मोरोक्को, स्पेन, चीन आणि संयुक्त अरब प्रजासत्ताक, ह्या देशांकडून रशिआ संत्रीं आयात करतो. परंतु, भारतामधील संत्र्यांचा दर्जा इतर देशांतील संत्र्यांपेक्षा अधिक चांगला आहे.

**हिंदच्या सहकार्यानें कारखाना**—इथिओपिआची राजधानी आदिसअबाबा येथें दाढी करण्याचीं पातीं तयार करण्याचा एक कारखाना हिंदच्या मदतीनें काढण्यांत येणार आहे. ह्या धंद्यांतील एका हिंदी कंपनीनें कारखाना उभारण्याचें काम एका वर्षांत पुरें करण्याचा करार इथिओपिआच्या सरकारशीं केला आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १८·९ लाख रुपये भांडवल लागेल आणि त्यांतून दरसाल १० कोटी पातीं तयार करण्यांत येतील. कांहीं हिंदी तंत्रज्ञ ह्या कारखान्यांत ५ वर्षेपर्यंत काम करतील.

**जपानमध्यें संस्कृतचा अभ्यास**—जपानमधील सात विद्यापीठांतून संस्कृत शिकविण्याची सोय असून कांहीं जपानी संस्कृतज्ञांनीं बऱ्याच संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरेंहि केलीं आहेत. टोकिओ विद्यापीठांत तर संस्कृत भाषेचा अभ्यास १८८८ सालापासून चालूं आहे. जपानमधील विद्वानांना शंकराचार्यांचें तत्त्वज्ञान आणि टागोर व विवेकानंद ह्यांच्या ग्रंथांविषयींहि जिज्ञासूंची आस्था आहे.

**म्हैसूर राज्यामधील बंदरांचें उत्पन्न**—१९६३-६४ सालीं म्हैसूर राज्यांतील बंदरांपासून अवघें १० लाख, ९०० रुपये उत्पन्न मिळालें. राज्यांत एकूण १९ छोटीं बंदरें आहेत. त्यांच्यापासून मिळणारें उत्पन्न सांगण्यासारखेंसुद्धां नाहीं. मंगलोर बंदरापासून ४·६४ लाख आणि कारवारपासून २·५७ लाख रुपयांचें उत्पन्न मिळालें. छोट्या बंदरांतील वाहतूक वाढली नाहीं तर तीं बंद करावीं लागतील.

**सिकिममधील जलविद्युत् केंद्र**—सिकिममधील पहिल्या जलविद्युत् केंद्राचें उद्घाटन सिकिमच्या महाराजांच्या हस्तें झालें. ह्या केंद्रासाठी ७१ लाख रुपये खर्च आला असून त्यांत २,१०० किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येईल. विद्युत् केंद्रें उभारण्याचें काम ५ वर्षांपूर्वी सिकिमच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत सुरू करण्यांत आलें. त्यावर भारताच्या मध्यवर्ती पाणी व वीज मंडळानें देखरेख केली.

**अमेरिकेच्या हल्ल्याची भीति**—उत्तर व्हिएटनामवरील वाढत्या हवाई हल्ल्यांच्या पाठोपाठ चीनच्या मुख्य भूमीवरहि अमेरिकन विमानें हल्ले चढवतील अशी भीति चीनला वाटत आहे. ह्या भीतीच्या पोटीं चीननें तिबेटमधील आपली निम्मी तरी लढाऊ विमानें तेथून हलवून अज्ञातस्थळीं नेल्याच्या वार्ता आहेत. त्याचप्रमाणें भारत-चीन सरहद्दीवरील फिरती रडार केंद्रें आणि विमानविरोधी तोफाहि कांहीं प्रमाणांत दुसरीकडे हलविल्या आहेत.

**अंदमान-निकोबार बेटांचा विकास**—अंदमान आणि निकोबार ह्या बेटांच्या आर्थिक विकासाला प्राधान्य देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ह्या बेटांत लाकडांचा उद्योगधंदा, मच्छीमार, उसाचे, अननसाचे व इतर प्रकारचे मळे इत्यादींची स्थापना करतां येण्यासारखी आहे. स्थानिक लोकांच्या उत्कर्षासाठी हा विकास करण्यांत यावयाचा आहे.

**कापड धंद्यांतील पदवी परीक्षा**—कोइमतूर येथील एका तांत्रिक कॉलेजांत कापडधंद्यांतील तंत्रविद्येच्या परीक्षेचा अभ्यासक्रम येत्या जुलै महिन्यापासून चालू करण्यांत येईल. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण समितीच्या दक्षिण विभागानें असा अभ्यासक्रम ठेवण्याची सूचना केली होती. अभ्यासक्रम ५ वर्षें मुदतीचा असेल व तो उत्तीर्ण होणाऱ्यास बी. एससी., टेक. पदवी देण्यांत येईल. पहिल्या अभ्यासक्रमासाठी ३० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येईल.

**युगांडांतील साखर कारखाने**—भारताच्या आर्थिक व तांत्रिक साह्यानें युगांडांत साखर कारखाने व तदूसंबंधित इतर कारखाने काढण्यांत येणार आहेत. कारखान्यांची मालकी मात्र स्थानिक सरकारची राहील. तद्देशीय कामगारांना व तंत्रज्ञांना शिक्षण देण्याचें कामहि तंत्रज्ञ करतील.

**स्टॅलिनला पुन्हा मानाचें स्थान**—रशिआच्या इतिहासांत स्टॅलिनला पुन्हा योग्य तें स्थान मिळण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. दुसऱ्या महायुद्धांत स्टॅलिननें केलेल्या चुका माजी पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह यांनीं जाहीरपणें सांगितल्या होत्या. स्टॅलिनला युद्ध म्हणजे काय हें सुद्धां माहीत नव्हतें असें म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. पण अलीकडे स्टॅलिनचें समतोल मूल्यमापन होऊं लागलें आहे.

**वरिष्ठ नोकरांना महागाईभत्ता**—मध्यवर्ती सरकारच्या ज्या नोकरांना दरमहा ६०० रुपयांपेक्षा अधिक पगार मिळतो त्यांना सध्यांच्या नियमाप्रमाणें महागाईभत्ता देण्यांत येत नाहीं. परंतु आतां ६०० ते १,००० रुपये पगार घेणाऱ्या मध्यवर्ती नोकरांना महागाईभत्ता देण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. त्यासंबंधीचे नियम तयार करण्यांत येत आहेत. एक हजारापेक्षा अधिक वेतन असणाऱ्यांना मात्र भत्ता देण्यांत येणार नाहीं.

**जंगली जनावरांचें रक्षण**—जंगलांतील पशुपक्षी शिकाऱ्यांकडून नष्ट होऊं नयेत म्हणून त्यांना सुरक्षित प्राणिसंग्रहालयांत ठेवण्यासाठी दिल्ली येथील प्राणिसंघटना प्रयत्न करणार आहे. देशांत अनेक ठिकाणीं छोटीं संग्रहालयें स्थापन करण्याचा संघटनेचा विचार आहे. या ठिकाणीं पशुपक्ष्यांच्या जीवनाचा अभ्यास करण्याच्या सवलतीहि देण्यांत येतील.

**खाजगी व सार्वजनिक विभागांतील विरोध**—अखिल भारतीय औद्योगिक कारखानदार संघटनेच्या ३२ व्या: अधिवेशनांत भाषण करतांना मध्यवर्ती सरकारचे कायदामंत्री श्री. सेन म्हणाले कीं, सध्यांच्या परिस्थितींत उद्योगधंद्यांच्या खाजगी व सार्वजनिक मालकीच्या विभागांनीं परस्परांतील विरोध व दुजाभाव नाहींसा करणें अत्यंत आवश्यक आहे. दोन्ही विभागांपैकीं कोणीच त्याच्याकडे सोपविण्यांत आलेली कामगिरी पार पाडलेली नाहीं.


## जनता सहकारी बँक लि., सांगली

( कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली )
( स्थापना १७ डिसेंबर १९६० )
शाखा— मार्केट यार्ड — ( फोन नं. ४८४ )
हेड ऑफिस, फोन नं. २४४
ऑडिट वर्ग " अ "

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १,४९,७१५ |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ७६,३८० |
| एकूण ठेवी | रु. | १८,३२,१६४ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ४८,४९,४१५ |

— खास वैशिष्ट्यें —

ज ] आकर्षक व्याजाच्या दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.
न ] बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
ता ] बँक सुरुवातीपासून २ टक्के डिव्हिडंड देत आली आहे.

दि. २६-१-१९६५ पासून बचत निधि योजना सुरू आहे. या संधीचा फायदा सर्वांनीं घ्यावा.

एम्. एस्. कराळे, चेअरमन

एस्. एस्. पांड्याजी, मॅनेजर
आमदार वसंतरावजी पाटील, व्हा. चेअरमन

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २

नाना वृहियाचेनि मिसें । परिणामें दूधचि जैसें ।
कां मूर्त होय ऊंसें । गोडी जेंवी ॥

### महाराष्ट्र राज्याच्या पांचव्या वर्धापनदिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचें अभीष्टचिंतन व आमच्या भागीदार, ठेवीदार व हितचिंतकांना अभिवादन

*बृहन्महाराष्ट्रांतील मध्यम वर्गानें गुंतविलेल्या भांडवलावर यशस्वी रीतीनें चालू असलेला हा साखर कारखाना मध्यमवर्गीयांचें भूषण होय !*

गो. श्री. वाळिंबे, बी. कॉम., ऑफिशिएटिंग मॅनेजर.

शं. ल. लिमये, बी. एससी., एलएल. बी., अध्यक्ष


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.